# महिला कला—वाणिज्य महाविदयालय चांदुर (रेल्वे), जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम अहवाल

## सत्र २०२३—२०२४

..........................................................................................................................................

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित महिला कला—वाणिज्य महाविदयालय चांदुर—रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रम अहवालः.

### १. स्तनपान सप्ताह निमित्त मार्गदर्शन कार्यक्रम

दिनांक ०६ ऑगष्ट, २०२३ ला जागतिक स्तनपान दिनामित्ताने स्तनपानाचे महत्त्व या विषयावर डॉ. सुषमा खंडार यानी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या इंग्रजी विभागप्रमूख डॉ. सीमा जगताप हया होत्या. यावेळी महाविदयालयातील सर्व प्राध्यापक तसेच महाविदयालयीन विदयार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

### २. “मेरी माटी, मेरा देश” कार्यक्रम

दि. ०९.०८.२०२३ रोजी “मेरी माटी, मेरा देश” या अभियानाची सुरूवात करण्यात आली. सर्व प्रथम देशाकरिता बलिदान दिलेल्या शुर विरांना श्रध्दांजली देण्यात आली. तसेच महाविदयालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आले. महाविदयालय परिसरामध्ये पंच प्राणवर आधारित शपथ घेण्यात आली. महाविदयालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. सीमा जगताप, डॉ. विजय कापसे, डॉ. प्रदीप दंदे, यांच्या प्रमुख उपस्थितीत भूगोल विभागप्रमुख प्रा. संजीव भुयार यांनी उपस्थित विदयार्थीनीं व शिक्षकेत्तर कर्मचारी पंच प्रण वर आधारीत शपथ दिली. मेरी माटी, मेरा देश या कार्यक्रमाची रूपरेषा रासेयो योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता एस. धुर्वे यांनी समजावून सांगितली. या शपथ कार्यक्रमाला जवळपास ६० विदयार्थीनींनी सहभाग नोंदविला. त्यानंतर “अमृत वाटिकेत” वाटचाल करून “मीटी को नमन” अतर्गत माती स्पर्श करून धरती मातेला वंदन करण्यात आले. यामध्ये महाविदयालयील विदयार्थीनींनी अतिशय उत्साहात सहभाग घेतला. सेल्फी विथ माटी या कार्यक्रमातर्गत विदयार्थीनींनी मातीला नमन करताना आपल्या मोबाईलमध्ये सेल्फी घेवून समाज माध्यमाचा वापर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता केला. या अभियानातर्गत विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा यामध्ये महाविदयालयीन विदयार्थीनींचा उत्स्फुत सहभाग लाभला.

दि. १२.०८.२०२३ ला दत्तक ग्राम बागापूर येथे स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. तसेच रासेयो पथक व ग्राम पंचायत बागापूर यांच्या संयूक्त विदयमाने माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला व सर्व गावकऱ्यांना पंच प्रण शपथ घेवून वीरांना वंदन करण्यात आले व “मेरी माटी, मेरा देश” या अभियानाविषयी जनजागृती करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत बागापूर येथील सरपंच सौ. प्रियंका चौधरी व ग्रामपंचायत सदस्य, गावकऱ्याचे सहकार्य लाभले. दि. १३.०८.२०२३ ते १५.०८.२०२३

ला हर घर तिरंगा कार्यक्रम राबविण्यात आला. अशाप्रकारे शासनाच्या वेगवेगळया सुचनेनुसार कार्यक्रम पार पाडला.

**३. पोषण महिना अतंर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन**

दिनांक २ सप्टेंबर २०२३, दरवर्षी सप्टेंबर महिना हा 'जागतिक पोषण महिना' म्हणून साजरा केला जातो. याचेच औचित्य साधून रोसेयोच्यावतीने महाविदयालयीन विदयार्थिनींना जनजागृती व्हावी म्हणून पोषण रॅली, रांगोळी स्पर्धा, स्लोगन स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, पोषण सुंदरी स्पर्धा असे विविध उपक्रम घेऊन जनजागृती करण्यात आली. तसेच हिमोग्लोबीन तपासणी शिबिराचे आयोजन देखील करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता डॉ. अमित बेलसरे ग्रामीण रूग्णालय चांदुर–रेल्वे व त्यांच्या संपूर्ण टिमचे सहकार्य लाभले. याकरिता महाविदयालयाचे प्राचार्य तसेच सर्व प्राध्यापक व विदयार्थिनीं मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**४. २६ नोव्हेंबर संविधान दिवस**

दिनांक २६ नोव्हेंबर, २०२३ ला राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे महाविदयालयात संविधान साजरा करण्यात ंआला. सर्व प्रथम डॉ बाबा साहेब याच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. नंतर रासेयो कार्यक्रम अघिकारी प्रा. अनिता एस. धुर्वे यांनी संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. याप्रसंगी सर्व प्राध्यापक व विदयार्थिनीं मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**५. एडस् दिनानिमीत्त जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम**

दरवर्षी १ डिसेंबर हा 'जागतिक एडस् दिन' म्हणून साजरा केला जातो. त्याचेच औचित्य साधून रासेयोच्यावतीने दिनांक ५ डिसेंबर, २०२३ रोजी एडस् रोगाविषयी जनजागृती व्हावी म्हणून रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा व रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच 'एडस् पासून वाचण्याचे उपाय' या विषयावर डॉ. अमित बेलसरे ग्रामीण रूग्णालय चांदुर–रेल्वे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ. अशोक पळवेकर, तर पाहुणे सर्व प्राध्यापक होते. या कार्यक्रमास मोठया संख्येने विदयार्थिनी उपस्थित होत्या.

**६. संत गाडगेबाबा जयंती कार्यक्रम**

दिनांक २० डिसेंबर, २०२३ ला संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. ंअशोक पळवेकर व सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. यानंतर संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर आधारित चित्रप्रदर्शनीचे उद्धघाटन करण्यात आले. या चित्र प्रदर्शनीला चांदुर रेल्वे येथील शाळा व महाविदयालयीन विदयार्थ्यानी भेट दिली व संत गाडगेबाबा यांच्या जीवनाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच शहरातून स्वच्छता रॅलीही काढण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या विदयार्थिनींनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**७. डॉ. पंजाबराव देशमुख जयंती कार्यक्रम**

दिनांक २७ डिसेंबर, २०२३ ला डॉ पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉ पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. ंअशोक पळवेकर व सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर आधारित पोस्टर स्पर्धा, भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी महाविद्यालयाच्या विदयार्थिनींनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**८. राष्ट्रीय मतदार दिवस**

दि. २५.०१.२०२४ रोजी "राष्ट्रीय मतदार दिवस" साजरा करण्यात ंआला. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणन न्या. सचिन शिंदे, उपविभागीय अधिकारी रविंद्र जोगी. तहसिलदार पुजा मातोडे, तर अध्यक्ष महाविदयालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर हे होते. तसेच डॉ. सीमा जगताप, डॉ. विजय कापसे, डॉ. प्रदीप दंदे, प्रा. संजीव भुयार व रासेयो अधिकारी प्रा. ंअनिता धुर्वे व महाविदयालयातील मोठया प्रमाणात विदयार्थीनी उपस्थित होत्या.

दि. ३० जानेवारी, २०२४ ला अमरावती जिल्हयाचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी विदयार्थीनींसी राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त संवाद साधला. याप्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक व महाविदयालयातील मोठया प्रमाणात विदयार्थीनी उपस्थित होत्या.

**९. छत्रपती शिवाजी महाराज जयंती**

दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ ला छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. ंअशोक पळवेकर व सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. यानंतर शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रप्रदर्शनीचे उद्घघाटन करण्यात आले. तसेच शहरातून रॅली ही काढण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या विदयार्थिनींनी वेशभूषा सादर केली. या वेशभूषेत सायली ठोंबरे (शिवाजी), प्रिया सुपली (सईबाई), प्रतीक्षा पाटील (पुतळाबाई), स्वाती भाले (जीजाबाई) यांनी घेतला. शेवटी, निर्जला वासनिक यांनी 'शिवगर्जना' सादर केल्यानंतर 'शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन' या विषयावर स्वाती भाले हिचे भाषण संपन्न झाले. या कार्यक्रमाला मोठया संख्येत रोसेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

**१०. जागतिक महिला दिनानिमीत्त मार्गदर्शन कार्यक्रम**

८ मार्च, हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमीत्त महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक व मोठया प्रमाणात विदयार्थिनी उपस्थित होत्या.

**११.जागतिक वनदिन साजरा**

दिनांक २१ मार्च, हा दिवस 'जागतिक वनदिन' म्हणून साजरा केला जातो. रोसेयोच्यावतीने महाविदयालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर, प्राध्यापक व रोसेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

**१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रम**

थ्दनांक १४ एप्रिल, २०२४ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. ंअशोक पळवेकर व सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर पुस्तकांचे प्रदर्शन लावण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाच्या विदयार्थिनींनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

| | |
|---|---|
| कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य |
| (प्रा. अनिता एस. धुर्वे) | (डॉ. अशोक पळवेकर) |

....................................

# नियमित कार्यक्रम फोटो

## सत्र २०२३—२०२४







“मेरी माटी, मेरा देश” अतर्गत वृक्षारोपण




पंच प्रण शपथ घेतांना विदयार्थी व प्राध्यापक वर्ग




“मेरी माटी, मेरा देश” अतर्गत वक्तृत्व स्पर्धा









“मेरी माटी, मेरा देश” अतर्गत दत्तक ग्राम बागापूर येथे स्मशानभुमीत वृक्षारोपण








“मेरी माटी, मेरा देश” अतर्गत मिटी को नमन






“मेरी माटी, मेरा देश” अतर्गत माजी सैनिक सम्मान






“मेरी माटी, मेरा देश” अतर्गत  हर घर तिरंगा



## हिमोग्लोबीन तपासणी शिबिर




## एडस् दिनानिमीत्त जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम






मतदान जनजागृती कार्यक्रम




महिला कला-वाणिज्य महाविद्यालय
चांदुर (रेल्वे), जि.अमरावती.
महिला कला-वाणिज्य महाविद्यालय


राज डिजीटल
महिला कला-वाणिज्य महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना
vivo Y21G







छत्रपती शिवाजी महाराज जयंती

वर्तमान पत्र कात्रणे

# महिला महाविद्यालयात 'स्वच्छतेसाठी श्रमदान' कार्यक्रम



चांदुर रेल्वे दि. १ : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. १ ऑक्टोबर रोजी शासनाच्या 'स्वच्छताही सेवा' या उपक्रमा अंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छतेसाठी श्रमदान' हा कार्यक्रम राबविण्यात आला.

अमरावती विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांच्या व शासनाच्या निर्देशानुसार 'स्वच्छतेसाठी श्रमदान' या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालय परिसरात करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे यांनी या कार्यक्रमाची पार्श्वभूमी विशद केली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थिनींनी या कार्यक्रमात त्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

n.com

हिंदुस्थान अमरावती

# महिला महाविद्यालयाची जनजागृती रॅली



चांदुर-रेल्वे : दि. ४ : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने 'जागतिक एड्स प्रतिबंधक दिना'निमित्त शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली.

या रॅलीत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या स्वयंसेवक विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे, डॉ. प्रदीप दंदे, प्रा. संजीव भुयार, प्रा. रश्मी खेडकर, प्रा. नीलिमा टिचुकले, प्रा. नीलिमा थोरात, प्रा. मृणाली वानखडे, पूजा देशमुख आणि रेखा मेश्राम यांचीही रॅलीत उपस्थिती होती.

## महिला महाविद्यालयात रेड रिबन क्लबच्या सहकार्याने

# एड्स नियंत्रण जनजागृती कार्यशाळा



**चांदूर रेल्वे /प्रतिनिधी-** विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने आणि रेड रिबन क्लबच्या सहकार्याने 'युवा दिना'निमित्त एड्स नियंत्रण जनजागृती कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.कार्यशाळेत चांदुर-रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयातील समुपदेशक अमित बेलसरे यांनी 'एड्स : कारणे आणि उपाय' या विषयावर उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर हे होते. ज्या कारणांमुळे एखाद्या व्यक्तीला एचआयव्ही पॉझिटिव्हची बाधा होते त्या कारणांपासून आपण दूर राहिले पाहिजे, ती कारणे आपण टाळली पाहिजेत, असेही समुपदेशक बेलसरे यांनी सांगितले. तसेच या ग्रस्ततेपासून पुढे एड्स पर्यंत होत जाणारा प्रवास प्रतिबंधित करण्यासाठी त्या विषयी आपण कुठलाही संकोच न बाळगता समाजात मोकळेपणाने बोलले पाहिजे, आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने वेळीच उपाययोजना केली पाहिजे,असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सीमा जगताप यांनी तर सूत्रसंचालन प्रा. रश्मी खेडकर यांनी केले.

दुसऱ्या दिवशी प्रा. प्रदीप दंदे आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण रुग्णालयात समुपदेशक अमित बेलसरे यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थिनींची तपासणी करण्यात आली.या कार्यक्रमाला प्रा. प्रदीप दंदे, प्रा. संजीव भुयार, डॉ. अतुल वानखडे, प्रा. नीलिमा थोरात आणि प्रा. टिचुकले यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महिला महाविद्यालयात संत गाडगे बाबा जयंतीनिमित्त छायाचित्र प्रदर्शनी




चांदुर-रेल्वे दि. २३ : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयात संत गाडगे बाबांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनावर आधारित दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

ही छायाचित्र प्रदर्शनी महिला कला-वाणिज्य महाविद्यालय, चांदुर-रेल्वे आणि संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र- संगाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती तसेच डॉ. पंजाबराव देशमुख ज्येष्ठ नागरिक संघ, चांदुर-रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रातून उपलब्ध करून देण्यात आलेली वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा यांच्या जीवनावर आधारित दुर्मिळ छायाचित्रे या प्रदर्शनीत ठेवण्यात आली होती.

या छायाचित्र प्रदर्शनीचे उद्घाटन ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. आतीश पवार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते, तर संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. दिलीप काळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. पंजाबराव देशमुख ज्येष्ठ नागरिक संघाचे अनंतराव देशमुख, ड. मनोहरराव देशमुख, कॉ. देविदास राऊत, भारत गेडाम, रमेश वाठ, सतीश देशमुख हेही विचारमंचावर उपस्थित होते. यावेळी कॉ. देविदास राऊत, डॉ. प्रदीप दंदे, डॉ. दिलीप काळे, भारत गेडाम, प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांनी आपले विचार मांडले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थिनी तसेच डॉ. सुषमा खंडार, हरिहरराव मसदकर यांच्यासह शहरातील अनेक गणमान्य लोक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अनुक्रमे डॉ. अतुल वानखडे आणि प्रा. अश्विनी बनकर यांनी केले.

# महिला महाविद्यालयात डॉ. भाऊसाहेब देशमुख यांना अभिवादन




चांदुर-रेल्वे दि. २७ : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयात डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अशोक पळवेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रदीप दंदे, प्रा. डॉ. अतुल वानखडे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे, प्रा. नितीन अंभोरे, पूजा देशमुख तसेच शिक्षकेतर कर्मचारी रेखा मेश्राम व रजनी वघवे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक अनुष्का गुल्हाने, भावना मेश्राम, प्रिया सुपले, सायली ठोंबरे, चंचल सहारे, मोनिका लाकडे, पायल हाडके, सीमा बावनथडे, तनुजा चिमणकर, रोहिणी मेश्राम, श्रद्धा बाबर, आरती पडोळकर, राणी सोनवणे ह्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या. त्यांनीही डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून आपली आदरांजली वाहिली.

# महिला महाविद्यालयात जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी विद्यार्थिनींशी साधला संवाद

## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त उपक्रम







**ता.प्रतिनिधी/२ फेब्रुवारी**

**चांदुर रेल्वे** : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयात अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचे व्याख्यान नुकतेच संपन्न झाले. याप्रसंगी आपण लोकशाही बळकट करण्यासाठी एक मतदार म्हणून अधिक जागरूक राहून आपण आपली कार्यतत्परता सिद्ध केली पाहिजे, असे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थिनींना केले. १४ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त 'विद्यार्थी-संवाद' या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर होते. तर प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार पूजा माटोडे उपस्थित होत्या.

याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थिनींशी संवाद साधताना जिल्हाधिकारी कटियार पुढे असे म्हणाले की, शिक्षण घेत असताना आपण आपली स्वयं अभिरुची व कार्यशैली विकसित करण्याच्या दृष्टीने याच अध्यापन काळात आपल्या व्यक्तिमत्त्वाची घडण करणे गरजेचे असते, तसेच आपल्या व्यक्तित्वात राष्ट्रजाणीव निर्माण करण्याची आस्था जपणेही महत्त्वाचे असते, असेही ते म्हणाले.

यावेळी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विभागप्रमुख डॉ. प्रदीप दंदे यांनी प्रायोजित केलेल्या 'लोकशाही माझ्यासाठी-मी लोकशाहीसाठी' हे घोषवाक्य असलेल्या पोस्टरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातर्फे मतदार जागृती करिता करीत असलेल्या कार्याबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले. अत्यंत व्यग्र कार्यक्रमातही जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी महाविद्यालयाला भेट देऊन विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले, त्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रदीप दंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. अतुल वानखडे यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# महिला महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी




चांदुर-रेल्वे दि. १९ : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती नुकतीच साजरी करण्यात आली.

प्रारंभी, प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महाविद्यालयाच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. तसेच शहरातून रॅलीही काढण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी वेशभूषा सादर केली. या वेशभूषेत सायली ठोंबरे (शिवाजी), प्रिया सुपले (सईबाई), प्रतीक्षा पाटील (पुतळाबाई), स्वाती भाले (जीजाबाई) यांनी सहभाग घेतला. शेवटी, निर्जला वासनिक यांनी 'शिवगर्जना' सादर केल्यानंतर 'शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन' या विषयावर स्वाती भाले हिचे भाषण संपन्न झाले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. संजीव भुयार, डॉ. सीमा जगताप, डॉ. विजय कापसे, प्रा. नितीन अंभोरे यांच्यासह संदीप झोडे आणि इतर शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे यांनी केले होते.

# महिला महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती साजरी



चांदुर-रेल्वे, दि. १४ : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयात भारतीय संविधानाचे निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून महाविद्यालयाच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी सहसंचालक- उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांच्या पत्रानुसार महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या पुढाकाराने प्रा. अनिता धुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली निबंध स्पर्धा, भीमगीत स्पर्धा इत्यादी कार्यक्रम, तर ग्रंथालय विभागाच्यावतीने पूजा देशमुख यांच्या सहकार्याने डॉ. आंबेडकरांचे साहित्य व त्यांच्या जीवनावरील ग्रंथांचे ग्रंथप्रदर्शन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अर्थशास्त्र विभागाच्यावतीने विभागप्रमुख डॉ. विजय कापसे यांनी डॉ. अशोक पळवेकर यांच्या 'निष्णात अर्थतज्ज्ञ डॉ. आंबेडकरांचे अर्थचिंतन' या शोधनिबंधाचे वाचन केले. शोधनिबंध वाचनानंतर त्यावरील चर्चेत प्रा. संजीव भुयार, डॉ. सीमा जगताप, प्रा. अनिता धुर्वे आणि डॉ. अतुल वानखडे यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर होते.

या कार्यक्रमाला प्रा. अश्विनी बनकर, प्रा. नितीन अंभोरे यांच्यासह संदीप झोडे, रजनी वघवे, रेखा मेश्राम हे शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.